## थोडक्यात...

### जिंतूर तालुक्यातील ग्रामीण भागातील युवकाचे राष्ट्रीय स्तरावर यश



**(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)**

**जिंतूर** - राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटीए) मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (एनटीईटी) २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, जिंतूर तालुक्यातील मौजे साईनगर तांडा, ता. जिंतूर, जि. परभणी येथील नीरज विठ्ठलराव आडे यांनी या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी १०० पैकी ६५ गुण मिळवत परीक्षा उत्तीर्ण केली आहे. नीरज आडे यांनी बीएएमएस, एम.एस. (सामान्य शल्यचिकित्सा) आयुर्वेद प्रवाहातून मास्टर ऑफ सर्जरी (एम.एस) अभ्यासक्रमासाठी ही परीक्षा दिली होती. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात अध्यापनासाठी आवश्यक मानल्या जाणाऱ्या या महत्त्वपूर्ण परीक्षेत त्यांनी मिळवलेले यश हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मानले जात आहे. राष्ट्रीय शिक्षक पात्रता परीक्षा ही राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत घेण्यात येणारी अत्यंत महत्त्वाची पात्रता परीक्षा असून, देशभरातील हजारो विद्यार्थी या परीक्षेसाठी स्पर्धा करतात. अशा कठीण आणि स्पर्धात्मक परीक्षेत नीरज आडे यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीचे फलित असल्याचे बोलले जात आहे. नीरज आडे हे ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे आलेले विद्यार्थी असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी शिक्षणाची वाट न सोडता राष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशामुळे साईनगर तांडा परिसरासह जिंतूर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे वडील विठ्ठलराव रतनराव आडे हे परिवहन महामंडळ जिंतूर येथे ट्रॅफिक कंट्रोलर म्हणून कार्यरत आहेत. मुलाच्या यशामुळे आडे कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. नीरज आडे यांच्या या यशामुळे वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रातील पुढील वाटचालीस नवी दिशा मिळणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

### मान्सूनपूर्व तयारीचा जिंतूर तहसील कार्यालयात आढावा; निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)**

**जिंतुर**- आगामी मान्सून काळात उद्भवू शकणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पूरस्थिती, वादळी वारे, अतिवृष्टी तसेच इतर आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. याच अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी सेलू शैलेश लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली जिंतूर तहसील कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस तहसीलदार जिंतूर, नायब तहसीलदार महसूल, पोलीस निरीक्षक जिंतूर व बोरी, मुख्याधिकारी नगर परिषद जिंतूर, गट विकास अधिकारी पंचायत समिती जिंतूर, तालुका आरोग्य अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान मा. उपविभागीय अधिकारी यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ११, २२ ते २४ आणि कलम ३८ अंतर्गत मान्सूनपूर्व तयारीची जबाबदारी प्रत्येक विभागाने गांभीर्याने पार पाडण्याच्या सूचना दिल्या. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपाययोजना राबविणे, विभागांमध्ये समन्वय राखणे तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# सन २०२४ –२५ मधील थकीत पिक विमा रक्कम देण्याबाबत कृषी मंत्री यांचे आदेश, आ राजेश विटेकर यांच्या पाठपुराव्यास यश

**परभणी** – खोटे कारणे दाखवून शेतकऱ्यांना पीकविमा नुकसान भरपाई देण्याबाबत टाळाटाळ करणाऱ्या या पीकविमा कंपनीला कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांच्या सक्षम भूमिकेमुळे, अखेर नमते घ्यावे लागले, प्रलंबित त्या सर्व शेतकऱ्यांना लवकरच पीकविमा रक्कम देणे भाग पडणार आहे , या प्रकरणी आ राजेश विटेकर यांनी ४ जून २०२४ रोजी तत्कालीन कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या कडे बैठक घेऊन पाठपुरावा चालवला होता, त्यास आज अखेर यश आले आहे

परभणी जिल्ह्यातील ८ महसूल मंडळातील अंदाजे ७८ गावातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे , जवळपास ही रक्कम ८० ते ९० कोटी रुपयांची असेल.

सन २०२४/२५ मधील खरीपातील सोयाबीन कापूस व इतर पिकांच्या नुकसानी प्रकरणी आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीने अद्याप पर्यंत शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई मदत दिलेली नव्हती, याबाबत आज मुंबई येथे झालेल्या बैठकीत आ राजेश विटेकर यांनी पुराव्यासह , राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालासह मुद्दा उपस्थित केला होता आयसीआयसीआय लोम्बार्ड या कंपनीने पीक कापणी प्रयोगाच्या वेळी , परभणी जिल्ह्यातील महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी गर्दी जमवून पीक कापणी प्रयोगाच्या आधी पीक कापणी प्लॉट खराब केला , पीक कापणी प्रयोग शेतकऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे व्हावा असा आमच्यावर दबाव जमावाने टाकला, पीक कापणी प्रयोगाचे फोटो व व्हिडिओ काढण्यास आम्हाला मनाई केली , वजन व उत्पादन कमी दाखवा असा दबाव शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यावर केला , तसेच कंपनीच्या प्रतिनिधींना मारहाण केली , असा आक्षेप आयसीआयसीआय लोंबाड कंपनीने करीत डिस्प्युट ( विवाद) दाखल केला होता

लोंबार्ड कंपनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न देण्यासाठी असे खोटे कारणे दाखवीत आहे व दिशाभूल करत आहे असा आक्षेप आमदार राजेश विटेकर यांनी तत्कालीन कृषी मंत्री मा.ना. श्री माणिकरावजी कोकाटे यांच्यासमोरच्या बैठकीत केला होता

त्यावेळी तत्कालीन कृषी मंत्री श्री कोकाटे यांनीही , नुकसान भरपाई द्यायची वेळ आली की ही नाटके सुचतात का ? शेतकऱ्या कडून जर तुम्हाला वरील प्रमाणे त्रास झाला होता तर त्याचवेळी तुम्ही जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे लेखी तक्रार का दिली नव्हती? आम्ही पोलीस सुरक्षा पुरवून तुम्हाला होणारा त्रास थांबवला असता , तसेच त्यावेळी दिलेली तुमची लेखी तक्रार व पुरावा पोहोच मला दाखवा असे म्हणत मंत्री महोदयांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना बैठकीतच फटकारले होते

कृषी आयुक्त पुणे यांनाही विमा कंपनीची अशी खोटी कारणे चालणार नाहीत . शासनाने केलेल्या पीक कापणी प्रयोगाच्या प्रमाणेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशा सूचना करीत कंपनीला बैठकीतच फटकारले होते

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२४-२५ जिल्हास्तरीय सुकाणू समिती व दिनांक ९ डिसेंबर २०२४ च्या बैठकीत अध्यक्ष व सदस्य यांनी, पीक कापणी प्रयोगाच्या वेळी पीक कंपनी प्रतिनिधी यांनी कोणतेही लेखी आक्षेप नोंदवले नव्हते, पीक कंपनीने ज्या प्रयोगाबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत ते आक्षेप तर उपस्थित असणाऱ्या विमा कंपनीच्या प्रतिनिधींना यांनाही माहिती नाहीत असा खुलासा केला आहे

पीक कापणी प्रयोगासाठी कृषी, महसूल व जिल्हा परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते परंतु आक्षेप असणाऱ्या अनेक ठिकाणी कंपनीचा प्रतिनिधी उपस्थित नव्हता असा निष्कर्ष काढून त्या बैठकीत कंपनीने केलेले आक्षेप फेटाळून लावले होते

सचिव ( कृषी) तथा राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष (एस टी ए सी ) च्या बैठकीत पीकविमा कंपनी ने परभणी जिल्ह्यातील ८ महसूल मंडळातील एकूण ६३ पीक कापणी प्रयोगावर आक्षेप नोंदवले होते ते पीक कापणी प्रयोग आक्षेप रद्द करावेत अशी मागणी केली होती

त्यावेळी कृषी आयुक्तालयाने असे स्पष्ट केले होते की, ने तंत्रज्ञानावर आधारित शासनमान्य नसलेल्या गुगल अर्थ इंजिन चा वापर केलेला आहे त्यामुळे त्यांच्या तांत्रिक अहवाल आम्हास मान्य नाही , तांत्रिक उत्पादनासाठी ४०% भारांकनाप्रमाणे प्रमाणे महा अग्री टेक प्रकल्पामार्फत अहवाल आम्ही मान्य करतो असे सांगितले तर विमा कंपनीने पीक कापणी प्रयोगाच्या बाबत मारहाण, दबाव ,फोटो काढू न देणे वरील प्रमाणे नोंद विलेले आक्षेपही चुकीचे आहे असे समितीने स्पष्ट केले ,

कंपनीचे अपील फेटाळून जिल्हास्तरीय आढावा समितीच्या दिनांक २४/ ४ / २०२५ च्या बैठकीप्रमाणे झालेल निर्णय कायम ठेवून कृषी आयुक्त कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या उत्पादनानुसारच विमा कंपनीने भरपाईची परिगणना व वाटप करणे बाबत राज्यस्तरीय समितीने निर्णय घ्यावा अशा सूचनाही केल्या

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष व सचिव ( कृषी) यांच्या स्तरावर अद्याप हा निर्णय अंतिम झालेल्या नाही , तो निर्णय होऊन सोनपेठ ,आवलगाव, शेळगाव मराठा, दैठणा, वडगाव, टाकळी कुंभकर्ण, रावराजुर (पालम ) दुधगाव (जिंतूर) या आठ महसूल मंडळातील गावांना सरासरी २० ते ३० हजार रुपये प्रति हेक्टरी प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी व ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबतचे आदेश आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीला देण्यात यावा , अशी मागणी आ राजेश विटेकर यांनी आजच्या बैठकीत माननीय कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांच्या कडे केली.

त्यावेळी कृषी मंत्री यांनी या पीकविमा कंपनीला विचारले तुम्ही दाखल केलेले आक्षेप हे, शेतकऱ्यांना मदत न देण्यासाठी केलेला बनाव आहे हे सर्व चौकशी मध्ये निष्पन्न झाले आहे, कोणताही सक्षम पुरावा विमा कंपनीने दिलेला नाही, म्हणून तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी असे आदेश दिले तेव्हा कंपनीने सांगितले की आमच्या कडे तसे कोणतेही सक्षम पुरावे नसल्याने आमचे डिस्प्युट आम्ही काढून घेतो .

आठ महसूल मंडळातील सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची प्रक्रिया सुरू करू, येत्या तीन महिन्याच्या आत ही प्रकिया पूर्ण करू, असे कंपनीने सांगितले , त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार असल्याचे आ राजेश विटेकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले

## प्रा आ केंद्र वाघाळा अंतर्गत सर्व कार्यक्षेत्रातील गावात १६ मे २०२६ जागतिक डेंग्यू दिवस




**(मुरलीधर गोंगे /दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी** - ''डेंग्यू नियंत्रणिसाठी लोकसहभाग, साठवलेल्या पाण्याची तपासणी करा,स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकून ठेवा'' असे घोषवाक्य बॅनर प्रदर्शन करून आरोग्य निरीक्षक सतपाल बोत व सुनील मगर यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करुन मोहीम राबविण्यात आली.. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावे, परिसराची स्वच्छता ठेवावे, तुंबलेल्या गटारी वेळोवेळी वाहत्या कराव्यात, रात्री झोपताना मच्छरदाणी चा वापर करावा, जुने टायर नारळाच्या करवंट्यातील पाणी रिकामे करून नष्ट करावेत, घरोघरी गप्पी मासे पाळावे, असे आवाहन करण्यात आले.. डासांपासून होणारे आजार रोखण्यासाठी जनसहभागही असल्यास डेंग्यू सारखे आजार उद्भवू शकत नाही असे यावेळी प्रा आ केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ सिद्दिकी व डॉ रोकडे यांनी व्यक्त केले.. हि मोहीम तालुका आरोग्य अधिकारी डॉ निखिल पुजारी व डॉ बाळासाहेब सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक सतपाल बोत व सुनील मगर, मीना चांदिवाले एल एच व्ही, वर्षाताई गट प्रवर्तक, आरोग्य कर्मचारी वसीम शेख,मेहत्रे,बागलाने,विहिटकर आरोग्य सेविका ठोंबरे, यादव, ढगे व सि एच ओ डॉ बरसाले डॉ देशमुख वाघाळा अंतर्गत सर्व आशाताई यांनी जनजागृती करुन मोहीम यशस्वी केली.. याकामी सर्व ग्रामपंचायतींचा सहभागही मोठ्याप्रमाणात होता हे विशेष..

## ''स्वच्छ-सुंदर मालेगाव''चा निर्धार हवेतच ?

**(प्रदिप सावले/ दै.धर्मयोध्दा)**

**मालेगाव-** मालेगाव शहरात दिनांक १० जानेवारी रोजी ''स्वच्छ-सुंदर मालेगाव''चा निर्धार करत नगरपंचायत प्रशासन,नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते शहर स्वच्छ व सुंदर करण्याच्या घोषणा देत गांधी चौक परिसरात साफसफाई करण्यात आली होती मात्र काही महिन्यांतच परिस्थिती पुन्हा ''जैसे थे'' झाल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. प्रभाग क्रमांक १३ मधील गांधी चौक परिसरात पुन्हा कचऱ्याचे ढीग साचले असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोरच अस्वच्छतेचे दृश्य दिसत आहे या ठिकाणी गायी व इतर जनावरे कचऱ्यात अन्न शोधताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे शासनाने देशी गायींना ''राज्यमाता-गोमाता''चा दर्जा दिल्यानंतरही शहरात त्यांची अशी अवस्था होणे दुर्दैवी असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### वाढत्या तापमानाने नागरिक हैराण

**परभणी :** देशात वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक शहरांमध्ये तापमान ४० अंशांच्या वर गेले असून उष्णतेची लाट तीव्र होत आहे. हवामान विभागाने नागरिकांना दुपारी बाहेर पडणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. पाण्याचे सेवन वाढवून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## चिकलठाणा फिटरवरील एजी सिंगल फेज वीजपुरवठा रात्री सुरू ठेवण्याची मागणी; आंदोलनाचा इशारा

**(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)**

**सेलू** - तालुक्यातील चिकलठाणा फिटरवरील सिंगल फेज वीजपुरवठा रात्रीच्या वेळी सुरू ठेवण्यात यावा, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे. याबाबत उपकार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय यांना निवेदन सादर करण्यात आले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चिकलठाणा फिटरवरील रात्रीचा सिंगल फेज वीजपुरवठा गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे आखाडे व निवासस्थाने शेतामध्येच असल्याने रात्री वीज उपलब्ध नसल्यामुळे त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतीसाठी पाणी देणे, मोटारी सुरू करणे तसेच इतर शेतीची कामे करणे कठीण झाले आहे. तसेच, रात्री वीजपुरवठा नसल्यामुळे विहिरीवरील बोअरवेल, मोटार, वायर तसेच इतर विद्युत साहित्यांच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वीजपुरवठा खंडित असल्याने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जावे लागत असून साप तसेच इतर वन्यप्राण्यांचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ रात्रीचा वीजपुरवठा पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा येत्या १९ मे २०२६ रोजी महावितरण कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर योगेश काकडे, रामा चट्टे, शरद पुरी, शिवाजी काळे, संभाजी काळे, वाल्मीक खुळे, दत्ता खुळे, प्रकाश मचाले, बन्सी भुजबळ, आबासाहेब भुजबळ, गजानन खुळे, धनंजय डासाळकर, प्रसाद मगर, तुकाराम मगर, काशिनाथ ढाले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कृषी निविष्ठा वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम

**मानवत-** येथे दिनांक १६/०५/२०२६ रोजी रेशीम किटकावरील उझीमाशीचे एकात्मिक व्यवस्थापन या पिक प्रक्षेत्र चाचणी अंतर्गत कृषी निविष्ठा वाटप व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन डॉ. प्रशांत भोसले, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. डॉ. अमोल काकडे, विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण), कृषी विज्ञान केंद्र परभणी यांनी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत रेशीम किटकावरील उझीमाशीचे एकात्मिक व्यवस्थापन याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.रेशीम किटकावरील परोपजीवी कीटक उझीमाशीमुळे रेशीम कोषाचे ४० ते ५० टक्क्यापर्यंत नुकसान होते. उझी माशीच्या नियंत्रणासाठी संगोपन ग्रहाच्या खिडक्या व दरवाजे नायलॉन वायर मेष जाळी वापरून संरक्षण करावे म्हणजे उझी माशी कीटक संगोपन ग्रहात सरळ प्रवेश करणार नाही. रेशीम कीटक संगोपन प्रवेशद्वारास १ कामगंध सापळा तिसऱ्या रेशीम कीटकाच्या वाढीच्या अवस्थेपासून लावावा त्यामध्ये वापरलेल्या ल्यूरकडे नर उझीमाशी आकर्षित होऊन नियंत्रण होते. उझी माशीच्या कोषावर उपजीविका करणारे निसोलायनेक्स थायमस हे परोपजीवी कीटक संगोपन ग्रहात चौथी कात टाकल्यानंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी १०० अंडीपुंजासाठी २ पाऊचेस याप्रमाणे सोडावेत. हे परोपजीवी कीटक उझी माशीच्या कोषावर उपजीविका करतात व एका कोषावर ४० ते ६० निसोलायनेक्स कीटक तयार होतात. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## तेलगाव - माजलगाव राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्ती साठी ३३ कोटी निधी मंजूर
## डॉ . ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला ग्रीन सिग्नल





**(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)**

**तेलगाव** - दै . धर्मयोद्धा सह अनेक दैनिकात महामार्ग ठरतोय मृत्यूचा सापळा या बातम्या प्रकाशित झाल्या मुळे तालुक्याचे रहीवाशी व आयुष्य मान भारत मिशन चे प्रमुख व मुख्य मंत्र्याचे विश्वासू डॉ ओमप्रकाश शेटे यांनी या महामार्गावरील रस्ते अपघाताची सविस्तर माहीती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन दिली व या २० कि मी . लांबीच्या सिमेंट कॉंक्रीट रस्ता दुरुस्ती साठी सुमारे ३३ कोटी रुपये निधीस मान्यता मिळवली आहे या महत्वाच्या महामार्गावरील दुरुस्ती साठी स्व:तहा जातिने लक्ष देणारअसल्याचे डॉ .शेटे म्हणाले तसेच सर्व पत्रकार , नागरिक यांनी ही या महामार्गाच्या दुरुस्तीचे काम चालू झालेवर विशेष लक्ष पुरवून सिमेंट रस्त्याच्या दुरुस्तीचे काम दर्जेदार कसे होईल हे पहावे असे आवाहन ही डॉ . शेटे यांनी केले आहे मागील ३ ते ४ वर्षापासून माजलगाव चे आमदार प्रकाश सोळंके यांनी देखील या रस्ते दुरुस्ती साठी शासनाकडे पाठपुरावा केला होता तसेच जनतेने पुकारलेल्या आंदोलनातही सहभागी होत आमदार सोळंके यांनी सार्वजनिक बांधकाम अभियंत्यास धारेवर धरले होते अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ निधी दुरुस्तीसाठी ऊपलब्ध करून दिल्या मूळे जनतेत समाधानाची भावना निर्मान झाली आहे

## टेंभी येथे श्री श्री रविशंकर ध्यान मंदिर भूमीपूजन सोहळा संपन्न

**(सुमित शिंदे/ दै.धर्मयोध्दा)**

**औसा** - श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसा निमित्त औसा तालुक्यातील टेंभी येथील धनराज गोमदे यांच्या संकल्प नेतून शेतामध्ये दोनशे लोकांना ध्यान करता असे ज्ञान मंदिराचे उदघाटन लातूर आर्ट ऑफ लिविंग चे जिल्हा समन्वयक कैलास पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आर्ट ऑफ लिविंग चे प्रशिक्षक कैलास पाटील, बसवराज वाघदरे,सुमित शिंदे. नागेश सड्डू, कवळी गावचे सरपंच नेताजी जगताप,तसेच आर्ट ऑफ लिविंग परिवारातील औसा व लातूर येथील स्वयंसेवक बसवेश्वर हिंगणे,मनोज पाटील,अजय पाटील, वैजनाथ सूर्यवंशी, अविनाश पवार, सुनील कावळे, युराज लद्दे, केदार गाजरे शिवाजी जगताप, मेघशाम घोगरे त्यांनी सर्व डब्ल्यू परिवाराचे सदस्य उपस्थित होते.

श्री श्री रविशंकर यांच्या ७० वाढदिवसानिमित्त श्री श्री ध्यान मंदिर भूमीपूजन सोहळा संपन्न टेंभी येथे सपन्न झाला अध्यात्मिक गुरु आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक पूज्य श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून औसा तालुक्यातील टेंभी येथे आयोजन करण्यात आला होता औसा आर्ट ऑफ लिविंग परिवार व आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वयंसेवक श्री श्री ध्यान मंदिराचे भव्य भूमीपूजन अत्यंत उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील नागरिकांना मानसिक शांतता, ध्यान आणि साधना करता यावी यासाठी या ध्यान मंदिराची निर्मिती करण्यात येत आहे. या ध्यान मंदिरामुळे पंचक्रोशीतील नागरिकांना आणि आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साधकांना साधनेसाठी हक्काचे आणि निसर्गरम्य स्थान उपलब्ध होणार आहे.या सोहळ्याला परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, आर्ट ऑफ लिविंग परिवार औसा व लातूरचे स्वयंसेवक उपस्थित होते. त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित असलेले...... आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमीपूजनानंतर उपस्थित सर्वांनी श्री श्री रविशंकर यांनी शेतकऱ्यांना झिरो बजेट शेतीचा फॉर्मुला दिला आहे यासाठी संजीवनी रस कसा तयार करायचा कमी खर्चामध्ये शेतीचे उत्पन्न कसे वाढवायचे यासंदर्भात आठवणींचे स्वयंसेवक प्रशिक्षक श्री बसवराज वागदरे यांनी टेंभी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमानंतर गुरु पूजा ध्यान, आणि सत्संगाचा कार्यक्रम जल्लोषात पार पडला.. गुरुदेवांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao